दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २५९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०१ मे २०२५







# पाकचे धाबे दणाणले ! सरकारचे डोळे '९ मे' कडे लागले...



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.३०, इस्लामाबाद :** पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. भारताच्या संभाव्य कारवाईमुळे पाकिस्तान धास्तावला आहे. आर्थिक स्थिती तोळामासा असलेला पाकिस्तान आता मित्र देशांकडे मदतीसाठी याचना करत आहे. भारताच्या कारवाईची धास्ती घेतल्यानं पाकिस्तानी शेअर बाजार कोसळला आहे. त्यानंतर आता आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजे आयएमएफ पाकिस्तानला १.१ अब्ज डॉलरची मदत करु शकतो.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्यकारी बोर्डाची बैठक पुढील महिन्यात ९ मे रोजी होणार आहे. पाकिस्तानी माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, या बैठकीत पाकिस्तानला १.१ अब्ज डॉलर (जवळपास ३०,८९० पाकिस्तानी रुपये) देण्याबद्दलचा निर्णय होऊ शकतो. ही रक्कम पाकिस्तानला ३७ महिन्यांपासून मिळत असलेल्या बेल आऊट पॅकेजचा भाग आहे. ९ मे रोजी होणाऱ्या बैठकीतून १.१ अब्ज डॉलरची आर्थिक मदत मिळाली, अशी आशा पाकिस्तानला आहे. त्यामुळे पाकिस्तान सरकार ९ मेकडे डोळे लावून बसलं आहे.

दुसरीकडे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं चालू आर्थिक वर्षासाठी पाकिस्तानच्या जीडीपी वाढीचा अंदाज घटवला आहे. पाकिस्तानचा जीडीपी ३ टक्क्यांनी वाढेल, असा आंतरराष्ट्रीय निधीचा आधीचा अंदाज होता.

त्यात आता ३० बेसिस पॉईंटची कपात करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय बँकेंनही पाकिस्तानचा विकासाचा अंदाजित दरात कपात करुन तो २.७ टक्क्यांवर आणला आहे. त्यामुळे आर्थिक आघाडीवर पाकिस्तानचा बोऱ्या वाजताना दिसत आहे. अशा परिस्थितीत भारतासोबत युद्ध झाल्यास पाकिस्तानची अवस्था आणखी बिकट होऊ शकते.

पहलगाम हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तान विरोधात कठोर पावलं उचलली आहे. सिंधू जल करार रद्द करण्याचा निर्णय भारत सरकारनं घेतला. त्यामुळे पाकिस्तानातील बऱ्याच भागात दुष्काळ पडू शकतो. भारताच्या निर्णयांनी पाकिस्तानात हाहाकार माजला आहे. देशातील शेअर बाजार सातत्यानं कोसळत आहे. आज कराची शेअर बाजाराचा निर्देशांक ४००० अंकांनी घसरला.

निर्देशांकात ३.५० टक्क्यांची पडझड पाहायला मिळाली. २२ एप्रिलपासून म्हणजेच पहलगाम हल्ल्यापासून कराची शेअर बाजाराचा निर्देशांक १,२०,००० वरुन १,१२,३३८ वर आलेला आहे. शेअर बाजारात सातत्यानं घसरण सुरु आहे.

## थोडक्यात

### बिबट्याने अंथरुणातून १० महिन्याच्या बाळाला उचलून नेलं



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.३०, दौंड :** दौंड तालुक्यातील दहिटणे या गावामध्ये एक भीषण घटना घडली आहे. येथे एका १० महिन्याच्या बाळाला बिबट्याने उचलून नेलं आहे. अनेक तासांच्या शोधमोहिमेनंतरही वनविभागाला या बाळाला शोधण्यात यश आलेलं नाही. तर, आपलं बाळ आपल्याच डोळ्यांसमोरुन बिबट्याने नेल्याने आई-वडिलांच्या डोळ्यातील पाणी थांबत नाहीये.

१० महिन्याच्या बाळाला अंथरुणातून उचलून नेलं

दहिटणे येथे एका मेंढपाळाच्या दहा महिन्यांचा मुलगा आण्विक भिसे (वय १० महिने) याला अंथरुणातून सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास बिबट्याने उचलून नेलं असल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बिबट्याने या बाळाला उसाच्या शेतात नेलं. धुळाजी भिसे असं या बाळाच्या वडिलांचं नाव आहे. गेल्या दोन दिवसांपूर्वी हे मेंढपाळ कुटुंब या परिसरात आपल्या बकऱ्या घेऊन चारण्यासाठी आले होते, अशी माहिती आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, रामभाऊ गायकवाड यांच्या उसाच्या शेतात धुळाजी भिसे हे मेंढ्या चरायला आहेत. बाळाला झोपवल्यानंतर त्याची आई अक्षय्य तृतीयेचा स्वयंपाक करण्यासाठी शेजारील पालावर गेली होती. तेवढ्यात या मेंढपाळाच्या दहा महिन्याच्या मुलाला बिबट्याने उचलून नेलं. सकाळी साडे नऊ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. आपल्या बाळाला बिबट्याने उचलून नेल्याचं दिसताच त्या बाळाच्या आईने जोर जोरात आरडाओरडा केला. मात्र, त्याचा काहीही उपयोग झाला नाही आणि या बाळाला घेऊन बिबट्याने उसाच्या शेतात धूम ठोकली. ही धक्कादायक घटना परिसरात वाऱ्यासारखी पसरली व ग्रामस्थांनी याची माहिती वन विभागातील कर्मचाऱ्यांना कळवली व वनविभागाचे कर्मचारी व यवत पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. सकाळपासून वनविभाग आणि पोलीस संयुक्तपणे बिबट्याचा शोध घेत असून आत्तापर्यंत आलेल्या वृत्ताप्रमाणे बिबट्याचा व बाळाचा शोध लागलेला नाही. सकाळच्या दिनचर्येप्रमाणे हे मेंढपाळ बांधव आपली काम करत होते, यावेळी हे लहान बाळ अंथरुणामध्ये झोपले होते, यावेळीच दबा धरून असलेल्या बिबट्याने डाव साधला आणि ही भयंकर घटना घडली आहे.

## ✻ निवेदन ✻

आज दि.०१ मे रोजी कामगार दिन, महाराष्ट्र दिनानिमित्त 'दैनिक अक्षराज' च्या कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या दि.०२ मे २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची सर्व वाचक, लेखक, हितचिंतक, जाहिरातदार, वृत्तपत्र विक्रेते/एजंट यांनी नोंद घ्यावी.

**संपादक**
**अक्षराज मीडिया**

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समस्या सोडवण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य - उपमुख्यमंत्री पवार



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.३०, मुंबई :** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राज्यात विविध इमारतींची कामे सुरु असून ही कामे पुढील पन्नास वर्षांचा विचार करुन दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच वक्फ मंडळासमोरील समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

राज्य वक्फ मंडळाशी संबंधित विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुशीफ, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद तसेच विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्यातील मुस्लिम बांधवांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य सेवा व इतर आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाच्या गरजा लक्षात घेऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. समाजातील युवकांना रोजगाराभिमुख शिक्षण व प्रशिक्षण मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील.

या बैठकीत वक्फ मंडळाच्या संपत्ती व्यवस्थापन, निधी वितरण, शिक्षण व इमारत प्रकल्पांशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागांना कार्यवाहीसाठी सूचना देत वक्फ मंडळाच्या समस्या दूर करण्यासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले.

# जिगाव प्रकल्पाच्या भूसंपादनाबाबत आठ दिवसात नव्याने प्रस्ताव सादर करावा - चंद्रशेखर बावनकुळे

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.३०, बुलडाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्पाच्या भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांनी ४० टक्के वाढीव मोबदला मागितला आहे. त्यामुळे ८ हजार ७८२ दावे प्रलंबित असून ते निकालात काढणे आवश्यक आहे. हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असून त्यासाठी २५ टक्के वाढीव मोबदला देण्याबाबत नव्याने प्रस्ताव तयार करुन पाठवावा. यासाठी सर्व शेतकरी, अधिकारी आणि वकील यांची एकत्रित बैठक घेण्यात यावी, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मिलिंद म्हैसकर, जलसंपदा सचिव डॉ. संजय बेलसरे, मुख्य अभियंता संजय टाटू, अश्विनी सैनी आणि बुलढाणा जिल्हाधिकारी किरण पाटील आदी उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री.बावनकुळे म्हणाले, जिगाव प्रकल्प हा शेतकऱ्यांच्या शेतीच्या पाण्यासाठी महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी जमीनीचे संपादन करणे आवश्यक आहे. संपादनासाठी शेतकऱ्याच्या सहमतीची आवश्यकता असून त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना २५ टक्के वाढीव मोबदल्याने थेट खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. आठ दिवसामध्ये हा प्रस्ताव सादर केल्यानंतर मदत व



पुनर्वसन प्राधिकरणाकडे बैठक घेण्यात येऊन निर्णय घेतला जाईल.

भूसंपादनाचा प्रश्न तात्काळ सोडविण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करण्यात यावे, असेही मंत्री श्री.बावनकुळे यांनी सांगितले. शेतकऱ्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी. त्याबरोबरच हा प्रकल्प लवकर मार्गी लावण्यासाठीही प्रयत्न केले जावेत. ८ हजार ७८२ प्रकरणांपैकी ५६५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. जिगाव प्रकल्प हा २६ टीएमसीचा प्रकल्प असून याद्वारे बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा, जळगाव, जामोद, शेगाव, खामगाव, संग्रामपूर, मलकापूर आणि अकोला जिल्ह्यातील तेल्हारा व बाळापूर या तालुक्यातील एकूण २८७ गावांना सिंचनाचा लाभ होणार आहे.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्यामुळे सुटला १५ गावांचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.३०, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे पोंभूर्णा तालुक्यातील १५ गावांचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. महिन्याच्या सुरुवातीला आढावा बैठक घेऊन १५ गावांची पोंभुर्णा ग्रीड पाणी पुरवठा योजना सुरू करण्याचे निर्देश आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिले होते. त्यानुसार कार्यवाही करीत प्रशासनाने या गावांचा पाणी पुरवठा सुरू केला आहे. ऐन उन्हाळ्यात पाणी टंचाईने होणारी अडचण दूर केल्याबद्दल गावकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

पोंभुर्णा ग्रीड अंतर्गत १ जून २०२२ ला १५ गावांची पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे (मजीप्रा) कार्यान्वीत करण्यात आली. त्यानंतर



मजीप्रातर्फे ही योजना जिल्हा परिषदेला हस्तांतरित करण्याचा प्रयत्न झाला. परंतु, १५ पैकी ८ गावांना पाणी पुरवठा नियमित होत नसल्यामुळे योजना हस्तांतरीत होऊ शकली नव्हती. त्याचवेळी मजीप्राकडे वीज देयकाचा भरणा करण्याकरीता निधी नसल्यामुळे ही योजना डिसेंबर २०२४ मध्ये बंद पडली. आणि १५ गावांची योजना बंद झाल्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली. माजी उपसभापती पं.स. पोंभूर्णा विनोद देशमुख यांनी यासंदर्भात आ. मुनगंटीवार यांना कळवले. त्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी पोंभुर्णा येथे दि. ५ एप्रिल २०२५ रोजी आढावा सभा घेतली. १५ गावांतील लोकांना पाणी टंचाई सोसावी लागत आहे. त्यामुळे योजना सूरू करण्याबाबत गावकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांच्याकडे आग्रह धरला. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी अधिकाऱ्यांना तात्काळ योजना सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर आ. मुनगंटीवार यांच्या आदेशांनुसार जिल्हा परिषद चंद्रपूरतर्फे २५ एप्रिल २०२५ रोजी पोंभुर्णा ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या थकीत वीज देयकाचा ५.७१ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला व पोंभुर्णा ग्रीड पाणी पुरवठा योजनेतून पाणीपुरवठा सूरू करण्यात आला.

## संपादकीय



### कामगार दिन

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या

१) कायद्याने आठ तासांचा दिवस
२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी
३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा
४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम
५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी
६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा
७) समान कामासाठी समान वेतन

या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉंब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूम शहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते. लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! **जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!**

# !! कामगार चळवळीचा गौरवदिन !!

सतराव्या शतकाच्या मध्यात सुरु झालेल्या औद्योदिक क्रांतीने युरोपमध्ये एका नव्या युगाची सुरुवात केली होती. मात्र या नवीन युगाबरोबरच नव्या समस्याही उदयास आल्या. त्यातील एक समस्या होती कामगरांची. युरोपात औद्योगिक क्रांतीला सुरुवात तर झाली मात्र कामगार वर्गाचे शोषण वाढीस लागले. त्यावेळी कामाचे तास हे आठ दहा नव्हते. तर कामगारांना तब्बल १५ तास काम करावे लागे. त्यातल्या त्यात जनावरासारखं काम करून मोबदलाही मिळत नव्हता. मात्र मजुरांनी याविरोधात आंदोलन पुकारलं. कामगारांच्या या पाऊलाने जगाच्या पाठीवर कामगारांचा नवा इतिहास कोरला गेला. मात्र आजही उद्योगहीन गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात नव्याने सुरू झालेल्या कंपन्या, उद्योगमालक कामगारांना मनमर्जीने खूप राबवून- शोषण करून घेत रग्गड मुनाफा कमवत आहेत. दररोज १० ते १२ तास कष्टवून घेत आहेत. रविवार जागतिक- सार्वजनिक सुट्टीचा वार असूनही सुट्टी मिळत नाही. कोणीही याबद्दल आवाजही उठवत नाही. कारण कामावरून काढून टाकण्याची धमकी पेरली जात आहे. याचेच मोठे नवल वाटते! विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षणसम्राट महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रयत्नांना व विचारांना बेमूर्वत पायदळी कुस्करले जात आहे.

आजच्या दिवशी अमेरिकेत कामगारांनी ७ तासांचे काम असावे अशी मागणी केली होती. ऑस्ट्रेलियात ही चळवळ पुढे आठ तासांचा दिवस म्हणून ओळखली जाऊ लागली. २१ एप्रिल हा दिवस तेव्हापासून ऑस्ट्रेलियात कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. मात्र १ मे रोजी ऑस्ट्रेलियात थरारक घटना घडली. युनायटेड स्ट्रेट्समधील कामगारांनी आठ तास काम करण्याचे आवाहन पुकारले. मागण्यांसाठी संप आणि मोर्चे निघाले. मात्र त्यावेळी झालेल्या आंदोलकांना पोलिसांनी ट्रकने हुसकावून लावले. या घटनेने कामगारांतील संताप आणखी वाढला. प्रत्युत्तर म्हणून पोलिसांवर बॉम्बस्फोट करण्यात आले. यात ७ पोलिस आणि ४ नागरिकांचा मृत्यू झाला. याप्रकरणी आठ जणांना अटक होऊन फाशीची शिक्षा सुणावण्यात आली. या घटनेने जगभर संताप व्यक्त झाला. कारण या ८ जणांपैकी कोणीही बॉम्ब फेकले नसल्याचे सांगण्यात येत होते. अशा प्रकारे या रक्तरंजित आंदोलनानंतर १ मे १९८० रोजी कामगार चळवळ यशस्वी झाली. न्याय्य वेतन, चांगली वागणूक, पगारी रजा आणि ८ तास काम या मागण्या मान्य करण्यात आल्या.

तेव्हापासून हा दिवस अमेरिकेत कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९०४मध्ये एमस्टरडॅम येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय संघ परिषदेने जगभरातील कामगार संघटनांना १ मे हा दिवस ८ तासांचा दिवस म्हणून पाळण्याचे आवाहन केले. भारतीय मजदूर किसान पक्षाने दि.१ मे १९२३ रोजी सर्वप्रथम कामगार दिन साजरा केला.त्याच वेळी भारतात प्रथमच कामगार दिनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल ध्वज वापरण्यात आला.

१ मे या दिवसाला महाराष्ट्रात खूप महत्त्व आहे, कारण या दिवशी महराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मात्र एवढंच नाही १ मेला आंतरराष्ट्रीय महत्त्वदेखील आहे. कारण जगभरात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. अठराव्या शतकात झालेल्या एका कामगार चळवळीच्या गौरवासाठी आजही जगभरात साजरा करण्यात येणारा हा एक खास दिवस आहे. भारतात कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. विशेष म्हणजे जगभरात अनेक देशांमध्ये हा दिन निरनिराळ्या पद्धतीने साजरा केला जातो. कामगार दिन साजरा करण्याची सुरुवात कामगारांच्या हितानिमित्त झालेल्या एका चळवळीतून झाली. १९व्या शतकाच्या मध्यावर कामगारांच्या एका तीव्र चळवळीला सुरूवात झाली. ज्यात कामगारांच्या हितासाठी काही मागण्या करण्यात आल्या होत्या. पहिली मागणी २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांनी केली होती. दिवसाचे कामाचे तास ठराविक असावेत यासंदर्भात ही मागणी होती. ऑस्ट्रेलिया पाठोपाठ पुढे मग अमेरिका, कॅनडामधील कामगार संघटनांनी पुढाकार घेत १९८६मध्ये कामगारांच्या हितासाठी मोर्चे काढण्यास सुरुवात केली. अशाच एका मोर्च्यामध्ये शिकागो मधील सहा आंदोलकांचा मृत्यू झाला. ज्याबद्दल कामगारांनी तीव्र निषेध व्यक्त केला. पोलिसांवर राग व्यक्त करण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीने बॉम्ब टाकला आणि त्यात आठ पोलिसांचा मृत्यू आणि पन्नास पोलीस जखमी झाले होते. याची शिक्षा म्हणून आठ आंदोलन कर्त्यांना फाशी देण्यात आली होती. मात्र त्यामुळे जगभरात संतापाची लाट पसरली, कारण त्या आठ जणांपैकी एकानेही बॉम्ब फेकलेला नव्हता. या रक्तरंजित इतिहासानंतर या आंदोलनाला एक भव्य दिव्य स्वरूप प्राप्त झाले. सन १९९०ला कामगारांची ही चळवळ यशस्वी झाली. शिकागोमधील या घटनेचे स्मरण करण्यासाठी रेमंड लेविन यांनी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी केली. त्यांनी ही मागणी १९८९ साली आयोजित दुसऱ्या आंतरराष्ट्रीय पॅरीस परिषदेत केली होती. त्या परिषदेमध्ये १ मे १८९० हा दिवस जागतिक एकता दिवस म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले. पुढे १८९१च्या दुसऱ्या परिषदेत या कार्यक्रमाला औपचारिक मान्यता देण्यात आली. ज्यामुळे आज जगभरात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस कामगारांच्या हितानिमित्त केल्या गेलेल्या त्या चळवळीचे प्रतिक आहे. ज्यामध्ये कामगारांनी दिवसाचे कामाचे तास आठ असावेत, अशी प्रमुख मागणी केली होती. कारण त्यापूर्वी कामगारांना दिवसभरात पंधरापेक्षा जास्त तास काम करावे लागत असे. पुढे लोक या चळवळीला आठ तासांची चळवळ म्हणूनही ओळखू लागले. या चळवळीत कामगारांच्या कामाच्या तासांसोबतच त्यांना कामाच्या बदल्यात मिळण्याऱ्या वागणूक आणि मोबदल्या विषयीही प्रमुख मागण्या करण्यात आलेल्या होत्या. शिकागो आंदोलनानंतर कामगारांना आठ तासांचे काम, योग्य मोबदला, चांगली वागणूक, पगारी सुट्टी मिळू लागली. निरनिराळ्या समाजवादी, साम्यवादी आणि अराजकवादी गटांनी केलेल्या निर्दशनासाठी १ मे हा दिवस ओळखला जातो. युरोपमध्ये पूर्वीपासून १ मे हा दिवस वसंतउत्सव म्हणूनही साजरा केला जात असे. पुढे या आंदोलनामुळे युरोपमध्ये ही हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा होऊ लागला. सन १९०४ साली एमस्टरडॅम येथे झालेल्या दुसऱ्या जागतिक परिषदेत संपूर्ण जगभरातील कामगार संघटनांना १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा करावा असं आवाहन करण्यात आलं होतं. आजही अनेक प्रमुख देशांमध्ये १ मे निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली जाते. त्याचप्रमाणे या दिवसानिमित्त अनेक देशांमध्ये खास कार्यक्रम आणि सैन्याचे संचलन आयोजित केले जाते. भारतात लेबर किसान पार्टीने १ मे १९२३ साली पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. त्यावेळी भारतात कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल रंगाचा झेंडा वापरण्यात आला होता. भारतात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली म्हणून महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा केला जातो.

**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

ज्या लोकांकडे पुरेसे शिक्षण नाही किंवा ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशा लोकांना आयुष्यात भरपूर कष्टाची कामे करावी लागतात. जगण्यासाठी पुरेसा पैसा कमवणे याची चिंता करण्यात त्यांचे आयुष्य जाते. कामगार चळवळीनंतर कामगाराच्या हितासाठी प्रत्येक देशात काही कायदे करण्यात आले आहे. भारतीय कामगार कायदा म्हणजे भारतातील कामगारांचे नियम करणारा कायदा. भारतात कामगारांना योग्य संरक्षण मिळावे यासाठी काही कायदे करण्यात आलेले आहेत. यात २०० राष्ट्रीय आणि ५० केंद्रिय कायद्यांचा समावेश आहे. भारतातील कामगार कायद्यांची व्याख्या एकसंध नाही. कारण सरकार स्थापना आणि भारतीय घटनेच्या समवर्ती यादीत कामगार हा एक विषय असल्यामुळे ते प्रत्येक राज्यात भिन्न आहेत. मात्र भारतात यासंदर्भात एक महत्त्वाचा कायदा नक्कीच करण्यात आला आहे. जो आहे दी चाईल्ड लेबर एक्ट ऑफ १९८६ थोडक्यात बालकामगार कायदा. लहान मुलांच्या हितासाठी करण्यात आलेला हा कायदा आहे. बऱ्याचदा लहान वयातच कष्टाची कामे करावी लागल्यामुळे अनेक लहान मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. या कायद्यानुसार भारतात चौदा वर्षांखालील बालकांना मजूरी अथवा काम करण्यास मनाई आहे. कामगारांच्या कामाची गुणवत्ता वाढवणे तसेच लहान मुलांचा मजूरीसाठी गैरवापर आणि छळवणूक टाळणे यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे. १ मे या दिवसाला महाराष्ट्रात खूप महत्त्व आहे, कारण या दिवशी महराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मात्र एवढंच नाही १ मेला आंतरराष्ट्रीय महत्त्वदेखील आहे. कारण जगभरात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. अठराव्या शतकात झालेल्या एका कामगार चळवळीच्या गौरवासाठी आजही जगभरात साजरा करण्यात येणारा हा एक खास दिवस आहे. भारतात कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. विशेष म्हणजे जगभरात अनेक देशांमध्ये हा दिन निरनिराळ्या पद्धतीने साजरा केला जातो. म्हणून कंपनीमालक आणि उद्योजकांनी मनमानी न करता कामगारांना त्यांच्या हक्काची सार्वजनिक- सरकारी रविवारची सुट्टी देणे अत्यंत रास्त आहे.

**!! कामगार दिनानिमित्त सर्व कामगारांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

## पासष्ठी..

पार करतोयं पासष्ठी
दमदारपणे महाराष्ट्र
सलाम त्या हुतात्म्यां
साहिले अपार कष्ट

उद्योग रोजगार संधी
करते सकलाआकृष्ट
समृद्धीचा महानमार्ग
जोडणे त्याचे उद्दीष्ट

इथले व्हा सुखे रहा
विचारअगदी सुस्पष्ट
परराज्यातून आलेले
इथेचं झाले धष्ट पुष्ट

शांत समृद्ध सुबत्तेला
लावू नका काक दृष्ट
टिळक बाणेदारपणा
दाखवू दिसता खाष्ट

एकत्मतेला तोडायचे
नका करु रे धारिष्ट
मदतीला नेहमी पुढे
येता कुणावर आरिष्ट

योजना साध्य दृष्ट्र्या
सुजाण इथे आर्टिस्ट
महाराष्ट्राचे योगदान
रे ना संपणारी लिष्ट

भिमराव शाहू फुलेंनी
सरे भेद थोर कनिष्ठ
शिवबाचे असे मावळे
देशाशी सदा एकनिष्ठ

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# मराठीला जिवंत ठेवा....!

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील मुंबई,पुणे व नागपूर यासारख्या शहरी भागात इंग्रजीचे वर्चस्व वाढले.कॉन्व्हेंट संस्कृती बोकाळली आणि कवी माधव जुलियन यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात म्हटलेल्या,मराठी असे आमुची मायबोली जरी । आज ती राजभाषा नसे ।। या ओवीच्या उलट स्थिती आज आहे म्हणजे, मराठी असे आमची राजभाषा । जरी आज ती मायबोली नसे ।।असे डॉ. सुभाष भेंडे यांनी म्हटले आहे. माया हेमंत भाटकर म्हणतात,मराठी हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे व महाराष्ट्रातच मराठी लोप पाहू लागली तर मराठी भाषा लुप्त व्हायला वेळ लागणार नाही.डॉ. राजन गवस प्रसिद्ध साहित्यिक यांच्या मते मराठीच्या बोलीभाषा ही नष्ट होत आहे. एकीकडे साहित्य संमेलने भरत आहे.मराठीचे काय होणार याची चिंता करणारी परिसंवाद होत आहे, पण प्रत्यक्ष कृतीला मात्र कोणीच पुढे होत नाही. बोलिंविषयी, भूमीविषयी तिरस्कार वाढत आहे.शेतकऱ्यांचा अखंड शब्दकोश नष्ट होत चालला आहे. ज्या बोलींचे सशक्त भांडार मराठीला बळ देणारे होते,तेदेखील नाहीसे होत चालले आहे.

सुप्रसिद्ध साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या मते, २५ वर्षानंतर मुंबईत मराठी भाषकांची संख्या शून्य येण्याची भीती आहे. ही खंत त्यांनी १९९० मध्ये कोकण मराठी साहित्य परिषदे मध्ये व्यक्त केली.१९६० मध्ये मुंबईत ५२% मराठी माणसे होती पण नवीन शासकीय आकडेवारीनुसार मुंबईत २६ टक्के मराठी माणसे आहेत. आणि हे तेवढेच खरे दिसत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार,अगदी बरोबर! यावर्षी बरोबर पंचवीस वर्षानंतर ५२% वरून २६ टक्के आली. अर्थातच हे शाश्वत सत्य झाले आहे. आपण मुंबईसारख्या ठिकाणी गेले असता, मराठी माणूस सुद्धा स्वतः इंग्रजी व हिंदी शब्दांचा वापर करतोय. बाजार, लोकल ट्रेन, भाजीपाल्याच्या दुकान वर असो अथवा हिंदी भाषेचा सर्रास वापर होताना दिसून येत आहे. गावोगावी इंग्रजी माध्यमांच्या शाळा चालू केल्याने जि प मराठी शाळेत विद्यार्थीच न येणे.यामुळे आता महाराष्ट्र शासनाने मराठीलाच गौण स्थान दिले. इंग्रजीची दासी केलेआहे. पहिलीपासून हसत खेळत इंग्रजीचे शिक्षण चालू केले.शिक्षण मंत्री प्राध्यापक मोरे यांनी म्हटले होते,मुलांना इंग्रजीची भीती वाटते म्हणून वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षापासून इंग्रजी शिकवले तर त्यांची इंग्रजीची मैत्री होईल. मग आपण समृद्ध होऊ. इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असून ही सर्वाधिक महत्त्वाची भाषा आहे. याचा परिणाम काय झाला कि, खेड्यापाड्यातून शाळेत विद्यार्थीच येत नाहीत शेकडा ४०% विद्यार्थी शाळेत उपस्थित राहत नाहीत. शासनाने त्याकरिता व खिचडी किंवा वरण-भात जेवायला देण्याची व्यवस्था केली तरी तीच अवस्था...!

सध्या सर्वत्र इंग्रजीतील फलक दिसतात. छोट्या दुकानांपासून तर मोठ्या दुकानांपर्यंत इंग्रजी फलकांची नावे दिसतात. त्याचप्रमाणे दुकानाच्या पावत्या,बस रेल्वेचे तिकीट, मॉल,मोठे शॉप यातून संगणिकृत खरेदीचे बिल हे सुद्धा इंग्रजी भाषेत दिसून येतात. त्यामुळे मुलांच्या समोर नेहमी-नेहमी इंग्रजी अक्षरांचा व शब्दांचा वापर होतो,त्यामुळे त्यांना आपल्या मराठी भाषेविषयी अनभिज्ञता जाणून येते. अहो! एवढेच काय, मराठी नीट बोलताना न येणे याचा अभिजनांना व महाजनांना अभिमान वाटतो. पालक सुद्धा म्हणतात,माझ्या मुला मुलीला मराठी नीट येत नाही. यात कसला अभिमान?एक-दोन इंग्रजीच्या कविता वाचून दाखवल्या तर त्यांची छाती गर्वाने फुगून होते.यावरून हेच सिद्ध होते की,आपण सुद्धा आपल्या मराठी भाषेचा तिरस्कार करण्यात कारणीभूत आहोत व मराठी भाषेला रसातळाला नेण्यास कारणीभूत आहोत.

मित्रहो! मराठी भाषेला जिवंत ठेवायचे असेल तर, शासकीय कामकाज प्रादेशिक भाषेत करायला हवे. हल्ली वृत्तपत्र वाचकांची संख्या खूप कमी झाली आहे. प्रत्येक मराठी माणसाने मराठी दैनिक, वृत्तपत्र घरी आणायला हवे. त्यातून मुलांसमोर मराठी भाषेचे साहित्यलिखाण डोळ्यासमोर असेल. लहान मुलांनाकडून छान-छान गोष्टीचे पुस्तक, आजीबाईच्या गोष्टींचे पुस्तक, वाचून घ्यायला हवी.जेणेकरून,मुलांना मराठी वाचन व भाषेविषयी ज्ञान मिळण्यास मदत होईल. दैनंदिन व्यवहारामध्ये मराठी माणसाने मराठीच शब्द वापरण्याचा निश्चय करायला हवा. स्वभाषेचा अभिमान बाळगून तिची अभिवृद्धी करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. चिनी, जपानी या भाषा संगणकाला चालू शकतात तर, मराठी भाषा का चालू नये? म्हणून संगणकीय व्यवहार करतानासुद्धा मराठी भाषेचा वापर करायला हवा. लहान मुलांना आई-वडिलांना मम्मी, डॅडी किंवा पप्पा म्हणण्यास शिकवण्यापेक्षा आई-बाबा म्हणायला शिकवून स्वभाषा अभिमान वाढवावा.प्रत्येकाने स्वतः पासून मराठीचा वापर करण्यास सुरुवात करावी. दारावरील पाट्या या मराठीत लावा. स्वतःची स्वाक्षरी सुद्धा मराठीत करण्यास शिका. संभाषण, नोंदी व लेखन यासाठी मराठीचा वापर करा. आपल्या महाराष्ट्रीयन तसेच भारतीय सणांच्या शुभेच्छा मराठी मध्ये देण्यास शिका.सध्या भ्रमनध्वनीवर संभाषण चालत असले, तरी मुलांना महिन्यातून एक किंवा दोन पत्र मित्रांना, आजी-आजोबांना स्वहस्ता क्षरात लिहिण्यास सांगा.दिनांक लिहिताना मराठी कालगणनेचा वापर करा.भ्रमणध्वनी वर बोलताना, हॅलो म्हणण्यापेक्षा नमस्कार म्हणून बोलण्यास सुरुवात करा.अश्या छोट्या छोट्या व्यवहारामध्येही आपल्या माय मराठीचा वापर केल्यास आपली मराठी भाषा जिवंत राहील...!

**समस्त मराठी बांधवांना मराठी राजभाषा दिनाच्या खूप खूप शुभेच्छा....!**
**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो. ९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आजपासून 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू' अभियानाला सुरुवात

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.३०, विंग (खंडाळा) :** ग्रामीण भागात शाश्वत स्वच्छता रहावी व दृष्यमान स्वच्छता दिसावी यासाठी खंडाळा तालुक्यात दिनांक ०१ मे २०२५ पासून 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू' हे विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. हे अभियान जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येणार आहे. ग्रामीण भागात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यापासून खत बनविण्यावर भर दिला जाणार आहे, अशी माहिती खंडाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वर्ग - १ अनिल वाघमारे यांनी दिली. ग्रामीण भागात घनकचरा व्यवस्थापनासाठी नॅडेफ किंवा कंपोस्ट खड्डे करण्यात आले आहेत. गावात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे योग्य पद्धतीने विलगीकरण करून, व्यवस्थापन करुन त्यापासून खत निर्मिती करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. अभियानाचा कालावधी हा दिनांक ०१ मे ते ३० सप्टेंबर राहणार आहे. अभियानाची पूर्वतयारी म्हणून २७ ते ३० एप्रिल दरम्यान घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी वर्गीकरण केलेला ओला कचरा जमा केला जाईल. २९ व ३० एप्रिल रोजी विविध माध्यमांद्वारे या मोहिमेची जनजागृती केली जाणार आहे. महाराष्ट्रदिनाचे औचित्य साधून १ मे रोजी या अभियानाचा ग्रामपंचायतस्तरावर औपचारिक शुभारंभ करण्यात येणार आहे. शुभारंभप्रसंगी गावातील ग्रामस्थ स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. अभियानास प्रारंभ झाल्यावर १ मे ते १० मे या काळात संकलित केलेला ओला कचरा नॅडेफमध्ये ओला कचरा, शेण व बारीक माती यांचा वापर करून शास्त्रोक्त पध्दतीने भरण्यात येणार आहे. प्रत्येक गावाने या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन आपले गाव स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी योगदान द्यावे.

## जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३०, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील बारड येथील शिवालय मंदिरात लिंगायत समाज बांधवाकडून जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विश्वगुरू जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करुन सामुहिक महाआरती करण्यात आली. यावेळी जयंती निमित्त महात्मा बसवेश्वर प्रतिमेची पूजा विधि प्रवीण स्वामी यांनी केली यावेळी समाजबांधवांनी पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीराम कोरे दिलीपराव कोरे सारंग स्वामी, प्रभाकर भिमेवार, यशवंतराव लोमटे, काशिनाथ मुलंगे, वसंत लालमे, नामदेव उपवार, प्रविण स्वामी,प्रमेश्वर यमले, सुरेश यमले, बालाजी कत्रे, गणपत बिचेवार, राजेश मुलंगे, सदाशिव तांडे, बालाजी आमदूरकर,देवबा कराळे, गणपत नलवार, पत्रकार नामदेव बिचेवार, स्वप्नील कोरे, रवी कराळे, रामेश्वर धुडकेवार,नागेश संगेवार यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टाकळी ढोकेश्वर येथील दत्त नाम सप्ताहाला प्रारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळीढोकेश्वर येथे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व दत्तनाम सोहळ्याचा प्रारंभ भक्तीमय वातावरणात झाला. श्री दत्त महाराज मंदिरात सुरु झालेल्या सप्ताहाचा प्रारंभ ह.भ.प. प्रसाद महाराज खिलारी (टाकळी ढोकेश्वर) यांच्या किर्तनाने झाले. तर दुसर्या दिवशी ह.भ.प. सुनील महाराज झांबरे (बीड) यांचे किर्तन रंगले होते. या धार्मिक कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या धार्मिक सोहळ्याला पहिल्या दिवसापासूनच भाविकांची उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या सप्ताहाचे हे ५७ वे वर्ष असून, आठ दिवस गावात हा भक्तीमय सोहळा रंगणार आहे. वैकुंठवासी ह.भ.प. गुरुवर्य बबन महाराज पायमोडे यांच्या प्रेरणेने, गुळवणी महाराज यांच्या आशिर्वादाने तर गुरुवर्य ह.भ.प. डॉ. विकासानंदजी महाराज मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडत आहे. या सोहळ्यात ह.भ.प. गणेश महाराज वाघमारे,आज बुधवार रात्री ८ ते १० समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांचे किर्तन सेवा लाभणार आहे. प्रविण महाराज गोसावी,अक्षय महाराज उगले , अजित महाराज दिघे, यांचे किर्तन होणार आहे. तर ५ मे रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. डॉ.विकासानंद महाराज मिसळ यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच व सर्व सदस्य, सेवा सोसायटीचे चेअरमन व संचालक, भजनी मंडळ व ग्रामस्थ व दत्त सप्ताह कमेटी परिश्रम घेत आहे.

## बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ.राहुल गेठे उपायुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात बेघर हटविणेसाठीची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई कार्यक्षेत्रातील बेलापूर विभागाअंतर्गत अे विभाग कार्यालय बेलापूर मार्फत बेघर हटविणेसाठी कारवाईचे आयोजन करुन, एल अँड टी ब्रिज खालील सेक्टर-४२, सिवूड्स, नवी मुंबई, येथील ४८ बेघर हटविण्यात आले. या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे, कनिष्ठ अभियंता आत्माराम काळे, अे विभाग बेलापूर येथील अधिकारी/ कर्मचारी तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. सदर मोहिमेकरीता मजूर, वाहन यांचा वापर करण्यात आला. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# आज मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा होणार गौरव

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी संदिप कळासरे यांची निवड




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, नांदेड :** जिल्हास्तर युवा पुरस्कार निवड समितीमार्फत सन २०२४-२५ (युवक) करिता संदिप हरीभाऊ कळासरे यांची निवड करण्यात आली आहे. या पुरस्काराचे स्वरुप १० हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असुन सदरचा पुरस्कार महाराष्ट्र दिन १ मे, २०२५ चा मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०२२-२३ चा अजय माधव पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सींग खेळाडू) रा. किनवट व सन २०२३-२४ चा लताताई परमेश्वर उमरेकर (पॅरा ऑलम्पिक आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू) रा. नांदेड यांना महाराष्ट्राचे मा. राज्यपाल महोदय व इतर मान्यवर यांच्या हस्ते बालेवाडी पुणे येथे गौरविण्यात आले असल्याने ते नांदेड जिल्हयाचे रहिवाशी असल्याने अजय माधव पेंदोर व लताताई परमेश्वर उमरेकर यांचा सुध्दा महाराष्ट्र दिन रोजी मान्यवरांच्य हस्ते यथोचीत सत्कार करण्यात येणार आहे.

राज्याचे युवा धोरण सन २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय १२ नोव्हेंबर २०१३ अन्वये जिल्हयात कार्यरत असलेल्या युवक, युवतीं व नोंदणीकृत संस्थानी केलेल्या समाजहिताच्या उल्लेखीत कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे.

यासाठी जिल्हयातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थाकडून जिल्हा युवा पुरस्कार सन २०२४-२५ या वर्षाच्या युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्राप्त प्रस्तावाची जिल्हास्तर युवा निवड समितीच्यावतीने छाणणी करुन अंतिम पुरस्कारार्थीची नावे निवडण्यात आली आहेत.

जिल्हयातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी, राज्य क्रीडा पुरस्कारार्थी, विविध एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू मुले-मुली, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमी यांनी दिनांक ०१ मे २०२५ रोजी वेळ सकाळी ८ वा. पोलीस परेड मैदान वजिराबाद नांदेड येथे मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

## ४ महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरी करणारा गुन्हेगार गजाआड




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३०, ठाणे :** ठाणे शहरात एका रात्रीत चार महिलांच्या गळ्यातून जबरदस्तीने सोनसाखळ्या हिसकावणाऱ्या सराईत गुन्हेगाराला ठाणे गुन्हे शाखेच्या घटक-१ पथकाने अटक केली आहे. आरोपीकडून एकूण १०० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, त्याच्यावर एकूण ९ गुन्ह्यांची नोंद आहे. दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी रात्रीच्या वेळेस नौपाडा, राबोडी आणि वर्तकनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महिलांच्या गळ्यातून सोनसाखळी चोरी झाल्याचे गुन्हे दाखल झाले होते. गुन्हे शाखेच्या तपासात मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीची ओळख पटवण्यात आली. आरोपीची ओळख :-

सलमान फिरोज खान (वय २५), व्यवसाय - हाउसकीपिंग, रा. भारत नगर, वाल्मीकी नगर, चाळ नं. १६, म्युन्सिपल शाळेजवळ, बीकेसी, मुंबई. गुन्हा केल्यानंतर आरोपी अजमेर, राजस्थान येथे फरार झाला होता.

मात्र तो परत मुंबईत परतल्याची माहिती मिळताच, नौपाडा परिसरातून त्याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून बजाज कंपनीची मोटारसायकल (MH-०१-BW-२२५८) जप्त करण्यात आली असून तीच त्याने गुन्हे करताना वापरल्याचे निष्पन्न झाले आहे.त्याच्यावर दाखल असलेले गुन्हे :-


आरोपीने खालील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली आहे:१. वर्तकनगर – गु.र.क्र. ३०६/२०२५२. राबोडी – गु.र.क्र. १९३/२०२५३. कापुरबावडी – गु.र.क्र. ११८/२०२५४. नौपाडा – गु.र.क्र. ३२६/२०२५, १६८/२०२५, ३७६/२०२५५. नारपोली – गु.र.क्र. २३३/२०२५६. कासारवडवली – गु.र.क्र. २१३/२०२५७. डोंबिवली – गु.र.क्र. १६६/२०२५या सर्व गुन्ह्यांमध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४) व ३(५) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

जप्त मुद्देमाल :-

१०० ग्रॅम सोन्याचे दागिने (मूल्य अंदाजे १० लाख रुपये) गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल (मूल्य सुमारे ८० हजार रुपये) एकूण जप्ती : सुमारे १०.८० लाख रुपयेआरोपीचे पूर्वगुन्हे:

मुंबईतील अंधेरी, सांताक्रुझ, मुलुंड आणि खार पोलीस ठाण्यांमध्ये सलमान खान याच्यावर ३९२, ३४, १८८, २६९ कलमांतर्गत गुन्हे दाखल आहेत. ही यशस्वी कारवाई पुढील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अमरसिंह जाधव (उप आयुक्त, गुन्हे, ठाणे), शेखर बागडे (सहाय्यक पोलिस आयुक्त, शोध-१) यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. सचिन गायकवाड, पो.उ.नि. दिपक घुगे, सपो.उ.नि. दयानंद नाईक व त्यांच्या पथकाने हे ऑपरेशन पार पाडले.

## नीट-२०२५ परीक्षेकरीता विद्यार्थी व पालकांची धावपळ सुरू



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि. ३०, कळंब (धाराशिव) :** प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी एमबीबीएस, बीएएमएस, बीडिएस, बीयुएमएस, बीपीटीएच,बीओटीएच, बीएमएसएलपी अशा विवीध वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नीट ही राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा देशभरात सर्वत्र एकाच दिवशी घेतली जाते. यावर्षीची नीट-२०२५ ही परीक्षा दिनांक ०४ मे २०२५ रोजी होणार असल्याचे जाहीर करणेत आले आहे. मागील वर्षी नीट परीक्षेत झालेली प्रचंड अनियमीतता, पेपरफुटी, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात झालेल्या हायप्रोफाइल व लाईव्ह सुनवण्या, प्रत्येक सुनावणीनंतर निकालाबाबत संभ्रम, एकाच परीक्षेचा लागलेला तीन वेळा निकाल, परीक्षार्थी-पालक-शिक्षक यांची झालेली तारांबळ, प्रचंड मानसिक-आर्थीक ताण त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दिलेला अंतिम निकाल, वाढलेला रँक, त्यानंतर झालेली प्रवेश प्रक्रिया, सर्व कांहीं अत्यंत भयंकर होते. बहूतेक याची दखल घेवून प्रत्येक वर्षी एनटीए म्हणजेच नॅशनल टेस्टींग एजन्सी मार्फत होणारी ही परीक्षा आता यावर्षीपासून एनटीए सह एनएमसी म्हणजेच नॅशनल आयुर्विज्ञान आयोग यांचमार्फत संयुक्तपणे होणार आहे. यात आता अधिक पारदर्शकता आणण्यासाठी देशभरातील जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना व त्यांच्या विभागांची मदतीने ही परीक्षा आता पार पडणार आहे.

**त्याचबरोबर परीक्षेवेळी ड्रेस कोड संदर्भात महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे प्रसारित करण्यात आली आहे. -**

१. कपडे शक्यतो फिकट रंगाचे असावेत (अनिवार्य नाही).

२. शर्ट/टॉप हाफ भायाचा असणे अनिवार्य आहे.

३. कपड्यांवर शक्यतो मोठे बटन्स, ब्राउच किंवा मोठा डिझाईन्स असू नये.

४. पॉकेट, छोटे बटन, कॉलर किंवा चेन असलेले शर्ट, जीन्स पॅन्ट, ट्रॅक पॅन्ट विद्यार्थी परिधान करू शकतात.

५. चप्पल किंवा कमी उंचीची सँडल घालून जाऊ शकतात. बूट/जास्त उंचीची सँडल घालून जाता येणार नाही.

६. विद्यार्थ्यांनी हाफ भायाचा टी-शर्ट व नाईट पॅन्ट किंवा ट्रॅक पॅन्ट व स्लीपर वापरणे उत्तम राहील. ७. विद्यार्थिनींनी टी-शर्ट किंवा सुती टॉप सोबत लेगिन्स व स्लीपर वापरणे उत्तम राहील.

वर दिलेल्या सूचनांप्रमाणे कम्फर्टेबल वाटेल असा कुठलाही ड्रेस विद्यार्थ्यांनी परिधान करावा. यासाठी वेगळे कपडे खरेदी करण्याची गरज नाही. तसेच येथील शिवतेज वैद्यकीय शिक्षण प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्राचे संचालक संतोष भांडे यांनी उमेदवाराने परीक्षा केंद्रावर फक्त खालील गोष्टी आणाव्यात याकरीता मार्गदर्शन केले आहे. प्रवेशपत्र आणि त्यावर चिकटवलेला पासपोर्ट आकाराचा फोटो उपस्थिती पत्रकावर एक पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा लागेल. वैध मूळ ओळखपत्राचा पुरावा, लागू असल्यास पीडब्ल्यूबीडी प्रमाणपत्र. प्रवेशपत्रासोबत डाउनलोड केलेल्या प्रोफॉर्मावर पांढरा पार्श्वभूमी असलेला एक पोस्टकार्ड आकाराचा (४X६) रंगीत फोटो चिकटवावा.

## सेनापती बापट पतसंस्थेच्या ठेवीदारांची अखेर कोर्टात धाव; पारनेर न्यायालयात फिर्याद दाखल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या सेनापती बापट पतसंस्थेच्या ठेवीदारांनी संचालक मंडळा विरूद्ध विश्वासघात व फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी पारनेर न्यायालयात धाव घेतली आहे. सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेकडे ठेवीदारांचे २५० कोटी रुपये अडकले आहेत. गेल्या वर्षभरापासून या संस्थेचे कामकाज ठप्प आहे. कोणतीही वसुली नाही. ठेवीदारांनी अनेक वेळा बैठका घेतल्या, आंदोलनाचा इशारा दिला परंतु संस्थेने कोणतीही दखल घेतली नाही. तालुक्याचे माजी आमदार विजय औटी यांनी या संस्थेची स्थापना पस्तीस वर्षापूर्वी केली होती. ही पारनेर तालुक्यातील पहिलीच सहकारी पतपेढी होती. औटी यांच्या अधिपत्याखाली चालू असलेल्या या संस्थेवर गुंतवणूकदारांचा (ठेवीदारांचा) मोठा भरवसा होता. परंतु विजय औटी काही वर्षापूर्वी संस्थेतून बाहेर पडल्याची ठेवीदारांना माहिती नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात ठेवीदारांनी गुंतवणूक केली. संस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले संस्था भक्कम स्थितीत असल्याची खोटी माहिती देऊन ठेवीदारांना वर्षभरापासून फसवत आहेत.

ऑक्टोबर २०२४ मध्ये ठेवीदारांचा मेळावा घेण्याचा बहाणा करून त्या बैठकीला विशेष सभा दाखवून संस्थेचे पारनेर येथील कोट्यवधी रुपये रकमेचे मोक्याच्या ठिकाणी असलेले मुख्यालय विक्रीचा बनावट ठराव घेतल्याचे दाखविण्यात आले. व्यवस्थापक मंडळाने त्यातून आलेल्या रक्कमा कोणत्याही ठेवीदारांना दिल्या नाहीत. विक्री केलेले मुख्यालय सध्या पूर्ण बंद असून संस्थेचे संचालक संपर्क बंद करून फरार आहेत. ठेवीदारांना संपर्क करण्याचे कुठेही ठिकाण ठेवले नाही. सर्व शाखांना टाळे लागलेले आहेत. संस्थेचे संस्थापक माजी आमदार विजय औटी यांनीही सध्या आपला या संस्थेशी काहीही संबंध नाही असे म्हणत हात वर केले आहेत. त्यामुळे जवळे येथिल एका ठेवीदाराने संस्थेच्या संचालक मंडळा विरूद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारा फौजदारी खटला पारनेर प्रथम वर्ग न्यायालयात दाखल केला आहे.

सदर प्रकरणी इतर ठेवीदारांनी ही पारनेर पोलिस व न्यायालयाकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी केलेली आहे. दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ठेवीदारांनी पारनेर पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांना निवेदन देण्यात आले आहे. ठेवीदारांनची मागणी असणाऱ्या निवेदनाची एक प्रत पारनेर न्यायालया समोर सादर केली आहे. संस्थेच्या दोन संचालकांनी त्यांचे म्हणणे ऐकण्या कामी अर्ज दाखल केला असल्यामुळे न्यायालयाने २० मे रोजी पुढील सुनावणी ठेवली आहे. पारनेर न्यायालयासमोर ॲड.रामदास घावटे हे ठेवीदारांची बाजू मांडत आहेत.

# दिघा विभागात पावसाळापूर्व कामे व सुविधांची आयुक्तांनी केली पाहणी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, दिघा (नवी मुंबई) :** शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीत समितीचे अध्यक्ष म्हणून नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी पावसाळापूर्व कामे १५ मे पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले असून त्या अनुषंगाने त्यांनी आज दिघा विभागामध्ये प्रत्यक्ष पाहणी करत सुरु असलेल्या कामांना गती देण्याचे निर्देश दिले.

यामध्ये त्यांनी ग्रीन वर्ल्ड पाठीमागील मोठया नाल्याची पाहणी करत त्याची व्यवस्थित साफसफाई करण्याच्या सूचना दिल्या तसेच नाल्याच्या बाजूस एम आयडीसी च्या जागेत मोठया प्रमाणावर डेब्रीज पडत असल्याचे लक्षात घेत त्यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने एमआयडीसीला याकामी महापालिकेमार्फत सहकार्य करुन ते थांबवावे असे निर्देशित करण्यात आले. दिघा गाव रेल्वे स्टेशन समोरील मुकंद कंपनी जवळील अंडरपासच्या ठिकाणी नागरिकांना चालण्यास त्रास होऊ नये व त्याठिकाणी पावसाळयात पाणी साचण्याची समस्या दूर व्हावी या दृष्टीने रस्त्यापासून काहीसा उंचावर बांधण्यात आलेला पदपथ नागरिकांच्या सोयीचा असल्याचे लक्षात घेत तो पदपथ पुढे साठेनगर पर्यंत वाढवावा व त्याबाजूची कुंपणभिंत ही पुढे वाढवावी तसेच यामध्ये अडथळा आणणारे अतिक्रमण हटवावे असेही निर्देश आयुक्तांनी दिले. ग्रीन वर्ल्ड समोरील बाजूस रेल्वे रुळांशेजारी नाल्याच्या बाजूला असलेल्या दुर्लक्षित जागेची नीटनेटकी स्वच्छता करुन त्याठिकाणी सुशोभिकरण करावे तसेच ठाणे बेलापूर रस्त्याचा त्याठिकाणी खंडीत झालेला पदपथ पुढे मुकंद अंडरपासपर्यंत पूर्ण करावा आणि पागचाऱ्यांना अडथळामुक्त चालता यावे. अशी सोय करावी असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.



याकरिता त्याठिकाणी असलेला पंप ही शेजारील उद्यानाच्या कोपऱ्यात स्थलांतरित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. त्याठिकाणचे सामुदायिक शौचालय काढून तेथे आरसीसी शौचालय उभारण्याचेही आयुक्तांनी सूचित केले.दिघा माता बाल रुग्णालयाच्या कामाची पाहणी करताना आयुक्तांनी कामाला गती देण्याचे व रात्रंदिवस नियोजनबध्द कामे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्याशेजारील जलकुंभाचे कामही जलद पूर्ण करुन मोरबे धरणाचे पाणी दिघ्यापर्यंत पोहचण्याच्या दृष्टीने आवश्यक चाचण्या करुन घ्याव्यात असे निर्देश दिले. माता बाल रुग्णालय व जलकुंभ याच्या पाठीमागील रस्ता बॉक्स कल्व्हर्टचा वापर करुन पूर्ण करावा.

तसेच एका बाजूला पार्किंगसाठी जागा विकसित करावी असेही निर्देश दिले. शहरातील मुख्य रस्त्यांची स्वच्छता काटेकोरपणे करण्याचे निर्देशित करीत विशेषत्वाने दिघा ते ऐरोली चिंचपाडयापर्यंत ठाणे बेलापूर मार्गावर दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते हे लक्षात घेत पोलीसांच्या मदतीने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. ठाणे बेलापूर मार्गावर दिघाबाबा देवस्थान समोरील दुर्लक्षित जागा स्वच्छ करुन त्याठिकाणी सुशोभिकरण करावे व त्या संपूर्ण रस्त्यावर पदपथ चालण्यायोग्य व्यवस्थित करावे. त्यामध्ये अडथळा येणारे अतिक्रमण दुर करावे असे स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या. अधिकाऱ्यांनी नियमित क्षेत्रभेटी देत नागरिकांना जाणवणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी तत्पर राहण्याचे निर्देश देतानाच आयुक्त डॉ.कैलास शिंदे १५ मे पर्यंत पावसाळापूर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. याप्रसंगी शहर अभियंता शिरीष आरदवाड, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे, परिमंडळ २ उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, परिमंडळ २ घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त संतोष वारूळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# कोकणात काजू बोंडापासून मद्य-शीतपेय आणि पडिक गवता पासून कागद-पुट्ठे निर्मितीचे कारखाने उभारण्याची मागणी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.३०, गुहागर (रत्नागिरी) :** महाराष्ट्र राज्याला विविधतेने नटलेला निसर्गरम्य आणि विस्तीर्ण असा कोकण विभाग लाभलेला आहे. कोकण म्हटले की कोकण किनारपट्टीला लाभलेला अथांग असा अरबी समुद्र. कोकण किनारपट्टीवर नारळी पोफळीच्या बागा तर कोकण माथ्यावर सह्याद्रीच्या रांगा आणि या दोन्ही मधील भाग हा उंच-सखल, चढ-उताराचा, नदी-नाल्यांचा, दऱ्या-खोऱ्यांचा, काही भाग खडकाळ कातळवटीचा तसेच वरकस जमिनीचा तर काही पठारी जमिनीचा अशी भौगोलिक परिस्थिती कोकणाची आहे.



कोकणात मोठ्या प्रमाणात हापूस आंबा, काजूंच्या बागा आहेत. हापूस आंबा आणि काजू हे एक कोकणातील उत्पन्नाचे प्रमुख साधन बनले आहे. काजू बी पासून काजूगर हा सुका मेवा म्हणून वापरला जातो. तर बी काढून काजू बोंड बहुधा फेकून दिली जातात. त्यापासुन मद्य (काजूफेणी) किंवा शीतपेय तयार करता येऊ शकते.

कोकणात वानर, माकडे यांची मोठ्या प्रमाणात वाढती संख्या आणि उपद्रवी वन्य पशू रानडुक्कर, रानगवे इत्यादी नुकसान करणाऱ्या प्राण्यांच्या त्रासाला कंटाळून कोकणातील शेतकऱ्यांनी व बागायतदारांनी शेती तसेच बागायती करणे सद्या सोडून दिलेले आहे. सरकार कडून सुद्धा या समस्यांवर काही ठोस उपाय योजना होताना दिसत नाहीत. त्यामुळे शेतीक्षेत्राच्या ओसाड रानमाळावर सुद्धा विस्तीर्ण गवताळ प्रदेश वाढत चाललेला आहे. या गवताळ रानमाळावर अनेक वेळा काही विकासदोही माथेफिरू व्यक्तींकडून आग (वनवा) लावला जातो. त्यामुळे आंबा व काजू बागायतींचे फार मोठे आर्थिक नुकसान सुद्धा होते आहे.

कोकणातील ओसाड रानमाळावरील असे गवत /वैरण म्हणून काढल्यास आपल्या राज्यातील म राठवाडा, विदर्भ सारख्या दुष्काळग्रस्त भागात तसेच राज्यातील गोशाळेतील जनावरांसाठी चारा/वैरण म्हणून उपयोग करता येऊ शकते. तसेच गवता पासून कागद किंवा पुठ्ठा सुद्धा तयार करू शकतो. कोकणातील काजू बागायतीतील बी काढून असे फेकून दिली जाणारी काजू बोंड पासून मद्य (काजूफेणी) किंवा शितपेय बणविणिरे कारखाने आणि वरकस पठारावरील गवता पासून कागद किंवा पुट्ठी बनविणारे प्रदूषण विरहित कारखाने कोकणातील प्रत्येक तालुकात उभारल्यास स्थानिक बेरोजगार तरुण/तरूणींना चांगला रोजगार उपलब्ध होऊ शकतो. तरी असे उद्योग-धंदे / कारखाने कोकणातील सर्व तालुक्यांत उभारून कोकणातील सुशिक्षित बेरोजगारांच्या / महिलांच्या हातात काम मिळवे. यासाठी कोकणातील सर्व लोकप्रतिनिधी, महोदयांनी सरकारकडे पाठपुरावा करावा. अशी मागणी गुहागर तालुक्यातील ग्रामपंचायत उमराठचे सरपंच जनार्दन आंबेकर यांनी केली आहे.

# जुलैपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अरण तीर्थक्षेत्राच्या विकास - जयकुमार गोरे

## ग्रामविकासमंत्री गोरे यांच्या निर्णयाचे संत सावतामाळी क्रांती परिषदेतर्फे स्वागत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** शाहू फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये म हापुरुषांच्या स्मारकांसाठी आणि साधू संतांच्या धार्मिक स्थळांसाठी शासन निधीची कमतरता भासू देणार नाही. ही आमची ऊर्जास्थाने, शक्तीपीठे असून यांचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मा उपमुख्यमंत्री छगन भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार शासन कटिबद्ध असल्याचे सांगतानाच संतश्रेष्ठ सावता महाराजांच्या अरण तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा येणाऱ्या कॅबिनेटमध्ये मंजूर करून २४ जुलै च्या अगोदर सर्व प्रशासकीय आणि कायदेशीर बाबींची पूर्तता करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन करण्याचा शब्द ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिला. अरण (ता. माढा) येथे आयोजित चंदन उटी कार्यक्रम आणि भक्त परिवाराच्या मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते.




आपल्या भाषणात ७३० वर्षाच्या धार्मिक परंपरेचा वारसा असणाऱ्या संत सावता महाराजांच्या अरण नगरीचा विकास आजपर्यंत झाला नाही याची खंत व्यक्त करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाला गती दिल्याचे सांगून या अगोदरच्या सत्ताधाऱ्यांवर त्यांनी निशाणा साधला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मठिकाणा चा विकास करण्यासाठी दहा एकर क्षेत्र विकत घेत १४५ कोटी रुपये ची तरतूद केली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कडगुण या जन्मस्थळाचेही स्म रकामध्ये रूपांतर करण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सह महाराष्ट्रातील सर्वच महापुरुषांच्या स्मारकाचा विकास करणे आपल्या शक्ति स्थळांचा ऊर्जास्थानांचा विकास करणे यासाठी शासन कुठल्याही प्रकारच्या निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे त्यांनी पुन्हा एकदा सांगितले.

मागास व बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे यांनी अरणच्या तीर्थक्षेत्रासाठी पाहिजे तेवढा निधी देऊ, पैशाची काळजी करू नका. सावित्रीबाई फुले स्मारकास सुद्धा निधी मंजूर केला आहे. महात्मा फुले यांच्या भिडे वाड्याचा प्रश्न कोर्टातून सरकारच्या बाजूने सुटला आहे. यामुळे भिडेवाड्याचा विकास यापुढे होणार आहे.

महात्मा फुले यांचा राहते घर फ ुले वाड्या साठी १०० कोटी रुपयांची तरतूद सरकारने केली आहे. ओबीसी मंत्रालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकरी सर्वसामान्य नागरिक सक्षम झाले पाहिजेत असे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी आणि राज्य सरकार यांचे धोरण आहे.

ओबीसी मंत्रालयाच्या माध्यमातून पूर्वी फक्त दहा विद्यार्थ्यांना मिळणारी परदेश शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती वाढवत वाढवत आता १०० वर आणली आहे. त्यासाठी असणारी २० लाख रुपये मर्यादा ४० लाखापर्यंत नेल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी आमदार अभिजीत पाटील, रंजनभाऊ गिरमे, रणजीतसिंह शिंदे ,रमेश बारस्कर, शिवाजी कांबळे, भारत शिंदे, निलेश गिरमे, प्रसाद डोके, राजकुमार हिवरकर, संतोष पाटील, मनोहर डोंगरे, शंकरराव लिंगे, प्रकाश गोरे, निशिगंधा माळी, पोपटराव बारवकर, योगेश पाटील यांचेसह संत सावता महाराजांचे वंशज सावता महाराज वसेकर, प्रभू महाराज माळी, साखरचंद लोखंडे म हाराज, आबासाहेब खारे, नगरसेवक अजिनाथ माळी , पांडुरंग शिंदे,

सुर्यकांत गोरे गणेश बनकर, संतोष विधाते यांचे सह जिल्हा तालुका कार्यालयाचे सर्व अधिकारी आणि संत सावता महाराज भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. यानंतर आयोजित कार्यक्रम च्या प्रास्ताविकामध्ये संयोजक प्रभू महाराज माळी यांनी तीर्थक्षेत्राला अ वर्ग दर्जा आणि १०० कोटी रुपये जाहीर केल्याबद्दल आणि सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्या म्हणून जयकुम र गोरे यांना ग्रामविकास मंत्री आणि अतुलजी सावे यांना कॅबिनेट मंत्रीपदी निवड केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले.

# थोडक्यात

## ठाण्यात शुक्रवार, शनिवार दोन दिवस पाणीबाणी

**अक्षराज : संजय पंडित**



**दि.३०, ठाणे :** ठाणे महापालिकेला स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा शुक्रवार, दि.०२ मे २०२५ रोजी सकाळी ९.०० ते शनिवार, दि. ०३ मे २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत बंद राहणार आहे. या काळात ठाणे महापालिकेच्या स्वत: च्या पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करून पूर्ण २४ तास पाणी पुरवठा बंद न ठेवता टप्पाटप्प्याने एक वेळ पाणी पुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, २ मे रोजी सकाळी ९:०० ते शनिवार, ३ मे रोजी सकाळी ९:०० एलअँळवश्रऊँ पाणीपुरवठा बंद राहणार आहे. ठाणे महापालिकेच्या स्वत:च्या पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करून पूर्ण २४ तास पाणी पुरवठा बंद न ठेवता टप्प्याटप्प्याने एक वेळ पाणी पुरवठा सुरू ठेवण्याचे पुढील प्रमाणे नियोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी, २ मे रोजी सकाळी ९:०० ते रात्री ९:०० पर्यंत घोडबंदर रोड, पातलीपाडा, बाळकूम, ब्रम्हांड, पवार नगर, कोठारी कम्पाऊंड, डोंगरीपाडा, वाघबीळ या भागात पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तर, शुक्रवारी, दि.२ मे रोजी रात्री ९:०० पासून ते शनिवारी, दि.३ मे रोजी सकाळी ९:०० वाजेपर्यंत समता नगर, ऋतू पार्क, सिद्धेश्वर, इंटरनिटी, जॉन्सन, जेल, साकेत, उथळसर, रेतीबंदर, कळवा आणि मुंब्रा येथील काही भाग येथे पाणी पुरवठा बंद राहणार असल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.

दरम्यान शटडाऊनच्या काळात स्टेम प्राधिकरणाकडून योजनेमधील दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे आणि चेने येथे जलमापक बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होईल, याची कृपया नागरीकांनी नोंद घ्यावी. या पाणी कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन सहकार्य करावे, आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## मुदखेड येथे भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरात भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भगवान परशुराम यांच्या तैलचित्राचे विधिवत पूजन मुदखेडचे माजी नगराध्यक्ष रामराव चौधरी यांचे हस्ते करण्यात आले. मुदखेड येथील कालेजी देवी मंदिरात भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला यावेळी ब्राह्मण समाजातील प्रतिष्ठित गोविंदराव चौधरी, शीधरराव जोशी, उदय जोशी, पत्रकार दिनेश शर्मा, श्रीकांत देशमुख, अमोल कुलकर्णी, जितेंद्र शर्मा, प्रथमेश समुंदर, सुशांत भोसकर सह महिला वर्गाची संख्या बऱ्यापैकी होती प्रमुख पाहुणे म्हणून अमृत संस्थेचे अनिल डोईफोडे व संतोष कुलकर्णी यांनी उपस्थित होते. ब्रह्मवृंदांना मार्गदर्शन करताना ब्राह्मण समाज हा कसल्याही प्रकारचा गाजावाजा करीत नाही करता कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तळमळत असतो देव देश धर्म यांचे आचरण तो करत असतो आजघडीला ब्राह्मण समाज हा मोठमोठ्या व्यवसायात फार क्वचित असून विविध समाजातील समाजबांधवांचा विकासाचा स्तर वाढावा यासाठी राज्य शासनाच्या वतीने सुशिक्षित तरुण, व्यावसायिकांना व होतकरू महिलांसाठी महामंडळ स्थापन करुन कर्जाची व्यवस्था केली व स्तर सुधारण्याचा प्रयत्न केला. त्याच धर्तीवर राज्य शासनाच्या वतीने ब्राह्मण समाजाचा विकास व्हावा या उद्देशाने एक महामंडळ स्थापन करून कर्जाची व्यवस्था करण्यात आली असून सुशिक्षित तरुण, व्यावसायिकांना, महिलांसाठी योजना सुरू करण्यात आल्या असल्याची माहिती यावेळी माजी नगराध्यक्ष रामराव चौधरी यांनी अनुभव कथन करताना दिली. मी ब्राह्मण समाजाचा एक कार्यकर्ता असून सर्वच समाजांतील लोकांसोबत काम केलेले असल्यामुळे मला सर्वात जास्त काळ नगराध्यक्ष राहण्याचा मान ही मिळाला असल्याची माहिती दिली. तसेच आतापर्यंत मी माझ्या परीने होईल. तेवढी मदत गरजूंना केलेली असून ब्राह्मण समाजातील नागरिक, महिला, व्यावसायिक आदींनी मदतीची गरज असल्यास मदत करून त्या समाज बांधवास समाजात उभे करण्यासाठी मदत करण्याचे वचन ही दिले. अमृत संस्था पुणे महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मुलींसाठी रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त करण्यात आले होते. त्यात पहिला क्रमांक दिव्या मनोज शर्मा यांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

## इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रदीप मून यांचे मार्गदर्शन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, मुंबई :** जोगेश्वरी पूर्व बांदेकरवाडी येथील श्री समर्थ विद्यालयातील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांना श्रम आणि रोजगार मंत्रालयातून उपसंचालक म्हणून निवृत्त झालेल्या आणि सध्या सेबी येथे स्मार्ट ट्रेनर म्हणून कार्यरत असणारे शिक्षक प्रदीप मून यांनी विविध विषयांवर संवाद करून मुलांना म ार्गदर्शन केले.आपण जास्तीत जास्त मार्क्स कसे स्कोअर करू शकतो याचा कानमंत्र देखील दिला. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांनी पुस्तक, पुष्पगुच्छ आणि जॉय मेडल देऊन त्यांचे स्वागत केले. शाळेचे मुख्याध्यापक मधुकर पोलेकर, आणि शिक्षक वृंद तसेच पदाधिकारी किशोर साळवी आणि जॉयचे चंद्रशेखर सावंत, सुनील चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षक राजापकर यांनी मून आणि उपस्थितांचे शाळेच्या वतीने आभार मानले.